

# निवडून येण्याकरिताच कार्यकर्त्यांनी कामाला लागावे

## ना.एकनाथ शिंदे : रुकडी येथे संवाद बैठकीत प्रतिपादन

**रुकडी : हॅलो प्रभात**

शिवसेनेला लाडक्या बहिणीच तारणार असून कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात शिवसेनेचे उमेद-वार निवडून येण्याकरिता कार्यकर्तेत्यानी कामाला ला-गावे असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुकडी येथील संवाद बैठकीत केले. ते रुकडी (ता.हातकणगंले) येथे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीतील उमेदवार यांच्याशी संवाद साधताना बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणा-ले, कार्यकर्ते यांचे एकजूटी महत्वाची असून मी स्वता उमेदवार म्हणून कार्यरत राहावे. कार्यकत्याचा उत्साह पाहता कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात शिवसेना इतिहास घडवेल.

येथील लोकनेते खासदार बाळासाहेब माने क्रीडागंण येथे झालेल्या संवाद बैठकीस मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमले होते. बैठकीस पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धैर्यशील माने,माजी खासदार निवेदिता माने, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, आम.अशोकराव माने, माजी खासदार संजय मंडलिक महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील, विरेंद्र मंडलिक, सत्यजित कदम, माजी आमदार उल्हास पाटील,झाकीर भालदार सह प्रमुख कार्यकर्तेची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शक्तीप्रदर्शन

## प्रभाग ६ मध्ये आनंदराव मलगुंडे यांच्या प्रचार यात्रेला प्रचंड प्रतिसाद

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

नगरपालिका निवडणुकीत जोरदार रंगत चढत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेद-वार आनंदराव मलगुंडे , उमेद-वार एल.एन.शहा व पुष्पलता खरात यांच्या प्रचारयात्रेला आज जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शहरातील प्रभाग ६ मध्ये निघालेल्या रॅलीने निवडणूक वातावरण तापवले.हा प्रभाग संवेदनशील मानला जात आहे. सायंकाळी प्रचारयात्रेची सुरुवात यलम्मा चौकातून झाली. बुरुड गल्ली, कापुसखेड नाका,बाणेकर गल्ली, कैकाडी गल्ली, लाल चौक गांधी चौक मार्गे यलम्मा चौकात समारोप झाला.



प्रभागा ६ मधील सर्व भागातून रॅली काढण्यात आली. यावेळी युवक व महिलांची मोठी उपस्थिति होती. युवकांच्या हातात असणाऱ्या तुतारी वाजवणारा माणूस या निवडणूक चिन्हांच्या फलकांनी क्षणातच मतदारांचे लक्ष वेधून घेतले. ठीक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदराव मालगुंडे प्रभाग ६ चे उमेदवार एल एन शहा, पुष्पलता खरात यांचेसह राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक जयंत पाटील, उद्योजक सुरेंद्र पाटील,सचिन कोळी,विजय देसाई,धीरज भोसले,राजू बाणेकर,महेश पाटील,अरुण शिंगण,बाळासाहेब पोरवाल, प्रकाश ओसवाल,रतनचंद रायगांधी, परेश पाटील,अमोल देसाई, फिरोज खानजादे,अनिकेत शिराळकर, अनिल पावणे, बाळासाहेब भोसले, पांडुरंग बाणेकर अमित शहा, जितेंद्र शहा आदी कार्यकर्ते सहभागी झाले.

रॅलीत राष्ट्रवादीच्या विजयी घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. विशेष म्हणजे, या प्रचारयात्रेत प्रथमच मतदान करणार्या अनेक तरुणांनी सहभाग नोंदवत प्रभाग ६ मधील उमेदवार एल.एन.शहा यांना जाहीर पाठिंबा दिला.

### राष्ट्रवादीचा उत्साह दुपटीने वाढला

**निवडणुका जवळ आल्याने सर्वच पक्षांनी प्रचारात जोर धरला असताना नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदराव मलगुंडे यांच्या रॅलीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. मतदारांचा प्रतिसादात संवेदनशील असणाऱ्या प्रभाग सहा मध्ये झालेली प्रचार रॅली निर्णायक ठरू शकते असे मत माजी नगराध्यक्ष भगवान पाटील यांनी व्यक्त केले.**

# मौनी विद्यापीठात एनसीसी दिन साजरा



**गारगोटी : हॅलो प्रभात**

येथील श्री मौनी विद्यापीठात ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एन. सी. सी. व ५६ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. विभागामार्फत एन. सी. सी. दिन उत्साहात साजरा झाला. संस्थेचे चेअरमन मधुकरअप्पा देसाई यांच्या हस्ते अनामिका स्तंभास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. एन. सी. सी. कॅडेटमार्फत गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. श्री. देसाई यांच्या हस्ते ध्वज फडकवून मानवंदना देण्यात आली.

यावेळी सर्व कॅडेट्सना देश-सेवेची शपथ देण्यात आली. सेकंड ऑफिसर स्वाती यादव यांनी प्रतिज्ञा वाचन केले. यानंतर सर्व कॅडेट्सनी एनसीसी गीत गायन केले..

याप्रसंगी शासकीय प्रतिनिधी बाजीराव चव्हाण, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, उपप्राचार्य डॉ. एस. बी. देसाई, प्रा. सुनील जितकर, मुख्याध्यापक डॉ. एस. बी. शिंदे, लेफ्टनंट इंदिरा माने, लेफ्टनंट साताप्पा केणे, सेकंड ऑफिसर सचिन भांदिगरे, सेकंड ऑफिसर स्वाती यादव तसेच सर्व संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विक्रम भोसले यांनी सूत्रसंचालन केले.

# चंद्रकांत पाटलांचा सल्ला आणि सीईओ ॲक्शन मोडवर

## दिव्यांग सक्षमीकरणासाठी घेतली बैठक

**सांगली : हॅलो प्रभात**

पालकमंत्री चंद्रकांत पाटलांनी दिलेला ङ्कसीईओ, तुम्हीही थोडं क्शन मोडवर याङ्ख हा सल्ला केवळ शब्दांपुरता मर्यादित राहिला नाही. तो प्रशासनाने मनापासून स्वीकारल्याचे चित्र जिल्हा परिषदेत पाहायला मिळाले. मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी समाजा-तील दुर्लक्षित आणि अधिक लक्ष देण्याची अपेक्षा असणाऱ्या दिव्यांग घटकांशी बैठक घेत-ली. ही बैठक प्रशासनाचा मानवी चेहरा दर्शवणारी आणि दिव्यांगांच्या मनात नवा विश्वास पेरणारी ठरली.

मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानाच्या यशासाठी विशाल नरवाडे काम करत आहेतच. त्याच्या बरोबरीला जिल्ह्या-तील विविध प्राधान्यक्रम ठरवून त्यांनी दिव्यांग सक्षमीकरणापासून सुरवात केल्याचे दिसते. दिव्यांग संघटनांच्या या व्यापक बैठकीत त्यांनी दिव्यांग सक्षमीकरणाच्या



अनुषंगाने सविस्तर चर्चा केली. दिव्यांग व्यक्तिंच्या सर्वांगीण विकासास प्राधान्य असून, दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. दिव्यांगांचा पाच टक्के निधी आवश्यक बाबींवर खर्च होण्याच्या अनुषंगाने आयोजित या बैठकीत दिव्यांग बांधवांच्या नेमक्या अडचणी नरवाडे यांनी जाणून घेतल्या.


यावेळी दिव्यांग कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रशासन आणि दिव्यांग यांच्यामध्ये चर्चा घडली. यामध्ये प्रामुख्याने दिव्यांगांचा पाच टक्के निधी खर्च करणे, तालुकास्तरावर दिव्यांग भवन उभारणे, दिव्यांगासाठी सर्वच स्तरावर स्वतंत्र स्वच्छतागृह उभारणे, दिव्यांगांचा ऑनलाईन सर्व्हे करणे, जिल्हास्तरावर दिव्यांग सक्षमीकरण कक्ष स्थापन करणे, सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा परिषदेत आयोजित बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, दिव्यांग विभागाचे अधिकारी महेश धोत्रे, मंजिरी माने, रामदास कोळी, प्रमोद कुंभार, संजय कदम, सुरेश गायकवाड, शफीक खलिफा, कल्पना दबडे, यशवंत जाधव आदिंसह यांच्यासह दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी, कर्मचारी, दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# दत्त जयंतीनिमित्त गुरुचरित्र सप्ताहाचे आयोजन

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ शाखा नदीवेस नाका इचलकरंजी यांच्यावतीने श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ याग आणि श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार ता. २८ नोव्हेंबर ते शुक्रवार ता. ५ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या सप्ताह कालावधीत विविध अध्यात्मिक धार्मिक सेवा करण्यात येणार आहेत. सप्ताह कालावधीत श्री गुरुचरित्र पारायण बरोबरच



दररोज एक याप्रमाणे श्री गणेश याग, श्री स्वामी याग, श्री गीताई याग, श्री चंडीयाग, श्री रुद्र याग, श्री मल्हारी याग, असे विविध याग संपन्न होणार आहेत, सप्ताह काळात श्री स्वामी समर्थ महाराजांची त्रिकाळ आर-ती, संपूर्ण दिवसभर महिलांची तर रात्रभर पुरुष सेवेकऱ्यांची प्रहरे (अखंड नामस्मरण सेवा) होणार आहे या आध्यात्मिक आणि धार्मिक कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन सेवा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# सार्वजनिक शौचालयांच्या नुतनीकरणासाठी २ कोटीचा निधी

## आ.राहुल आवाडे यांच्या पाठपुराव्याला यश

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

माजी मंत्री प्रकाश आवाडे आणि आमदार राहुल आवाडे यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यातून सार्वजनिक शौचालयांच्या नुतनीकरणासाठी २ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. त्यातून शहरातील विविध १३ ठिकाणच्या सार्वजनिक शौचालयांच्या नुतनीकरण करण्यात येणार आहे. या कामाचा शुभारंभ जामदार गल्ली येथे करण्यात आला.

इचलकरंजी शहरातील महानगरपालिका हद्दीतील विविध भागात असलेल्या सार्वजनिक शौचालयांची अत्यंत दूरवस्था झाल्याने नागरिकांना अत्यंत अडचणी येत होत्या. त्यांचे



नुतनीकरण करण्याबाबत भागा-तील नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. या संदर्भात माजी मंत्री प्रकाश आवाडे आणि आमदार राहुल आवाडे यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून सार्वजनिक शौचालयांच्या नुतनीकरणासाठी निधी मंजूर करून आणला. या कामाची सुरुवात जामदार गल्ली येथून करण्यात आली. टप्प्याटप्याने उर्वरीत भागातील सार्वजनिक शौचालयांचे नुतनीकरणाचे काम होणार आहे. या कामामुळे भागा-तील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. याप्रसंगी बाळासाहेब कलागते, नंदु पाटील, पै. अमृत भोसले, सचिन माळी, प्रमोद बचाटे, सुशांत कलागते, अनिकेत पाटील, प्रमोद कोले, सुनील मुदगल, मनोज केसरकर, माया शिंदे, लता मुदगल, कांचन मोरे, वनिता कोले, विमल चव्हाण, रंजना कवटगे यांच्यासह भागा-तील नागरिक उपस्थित होते. या कामामुळे भागातील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.



# 'इंटरनेट ऑफ थिंग्स' वर प्रभुत्व मिळवणे काळाची गरज

**श्री चित्तरंजन महाजन**

**वारणानगर : हॅलो प्रभात**

तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडस्ट्री रेडी इंजिनिअर प्रोग्राम अंतर्गत तीन दिवसीय कृतिशील कार्यशाळेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या प्रसंगी डॉल्फिन लॅबचे प्रमुख श्री चित्तरंजन महाजन यांनी विद्यार्थ्यांना 'इंटरनेट ऑफ थिंग्स' या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचे महत्त्व समजावून सांगताना, दैनंदिन जीवनात इलेक्ट्रॉनिक्सच्या वाढत्या वापरामुळे खेढ ला पर्याय उरणार नाही; त्यामुळे या तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवणे ही काळाची नितांत गरज आहे, असे स्पष्ट मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी, वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष, आमदार डॉ. विनयराव कोरे, वारणा विद्यापीठाचे कुलाधिकारी एन.एच.पाटील, कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.व्ही. व्ही.कार्जीन्नी, प्राचार्य डॉ.डी. एन.माने यांनी शुभेच्छा दिल्या.

# ऊसतोड बांधवांना रिपब्लिकन सेनेने दिली मायेची ऊब

**गांधीनगर : उदय साळुंखे**

गडमुडशिंगी (ता.करवीर) येथे रिपब्लिकन सेना २७ व्या वर्धापन दिनानिमित्त ऊसतोड कामगारांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना ब्लँकेट वाटप करण्यात आले त्यावेळी बोलताना भीमराव गोंधळी रिपब्लिकन सेना करवीर तालुका अध्यक्ष म्हणाले ऊसतोडणी सारख्या अवघड कामासाठी स्थलांतरित होणारे कष्टकरी ऊसतोड कामगार आणि त्यांच्या वेगवेगळ्या आरोग्याची दृष्टीने व त्यांच्या मुलांना शिक्षणाची अत्यंत गरज आहे.

याकडे महाराष्ट्र शासनाने लक्ष देऊन ती मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शिक्षणाच्या सुविधा वाडी वस्ती वरती सुरू कराव्यात.ऊसतोडणी साठी दोन किलोमीटर पर्यंत ही चालत ये-जा करावी लागते त्यामुळे



कष्टाचे काम करून आणि कामाचे ठिकाणी ये- जा करून अशा दोन्ही बाबतीत त्या कामगारांना शारीरिक ऊर्जा खर्चावी लागते. आजही सरकारकडे ऊसतोड कामगारांचा ठोस आकडा नाही, अशी खंत अर्जुन कांबळे करवीर महासचिव यांनी काढले, त्यावेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ भोसले यांच्या हस्ते ऊसतोड बांधवांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

रिपब्लिकन सेना महासचिव अर्जुन गोंधळी यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. यावेळी शिवाजी कांबळे,संदीप गोंधळी,रविदास राठोड, रवि चव्हाण, मिराबाई चव्हाण, तानाजी काळेयांच्यासह ऊसतोड बांधव उपस्थित होते.



# गौरीशंकर फार्मसीचा विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत चमकला

**देगाव : हॅलो प्रभात**

डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे रायगड यांनी आयोजित केलेल्या विभागीय विद्यापीठ स्तरावरील क्रीडा स्पर्धेत गौरीशंकरच्या सातारा कॉलेज ऑफ फार्मसी देगाव महाविद्यालयातील अंतिम वर्ष बी फार्मसी मधील विद्यार्थी प्रतीक जाधव याने ८०० मीटर रनिंग या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर याच क्रीडा प्रकारात ४०० मीटर रनिंग मध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. त्याने मिळवलेल्या उज्वल यशाबद्दल त्याचे संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नागेश अलुरकर, उपप्राचार्य डॉ योगेश गुरव, विभाग प्रमुख डॉ.अविनाश भोसले, क्रीडा विभाग प्रमुख डॉ मनोज शिंदे, प्रबंधक हेमंत काळे आदी उपस्थित होते.